पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत वनविभागाच्या आखत्यारीत असलेल्या १४० अस्थायी पदांना सन २०१८-१९ पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०१८/प्र.क्र.१७/फ-२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २६ मार्च, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक, असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०४.१०.२००४

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एफडीएम २०१७/प्र.क्र.१५/फ-२, दि.१८.०१.२०१८.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.२३/२१९५/१७-१८, दि. २६.०२.२०१८.

प्रस्तावना :-

"पश्चिम घाट विकास कार्यक्रम अंतर्गत" वनविभागाच्या अखत्यारीत असलेली १४० अस्थायी पदे दि.०१.०१.२०१८ ते २८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र. ३ येथील दि.१८.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात आली होती. त्या अनुषंगाने प्रस्तूत १४० पदे दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत चालू ठेवल्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

२. पश्चिम घाट विकास कार्यक्रम अंतर्गत संदर्भ क्र.४ येथिल प्रस्तावाच्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील १४० अस्थायी पदे ही वनविभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने या १४० अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१८ ते ३०.०९.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबत वेतनावरील खर्च प्रधान शीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, (योजनेतर) ०१ वनीकरण, १०२ सामाजिक व क्षेत्र वनीकरण, ०१ वनरोपण व मृदआर्द्रता आणि मृद संधारण (०१)(०१) वनरोपण मृदआर्द्रता आणि मृद संधारण (२४०६ ०२३८) ०१ वेतन या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१८-१९ यावर्षी त्याखालील मंजूर होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा. सदर कालावधी मध्ये त्यांच्या आस्थापनेवरील मंजुर पदांचा आढावा घेवून सुधारीत

आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या नंतर सुधारीत आकृतीबंध निश्चीत करण्याकरीता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१२०४४८५३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.27 12:07:17 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१ .प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे/धुळे/कोल्हापूर/पुणे

४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५.जिल्हा कोषागार अधिकारी पुणे/ कोल्हापूर /सिंधुदुर्ग/सां गली/ठाणे/रायगड/रत्नागिरी/ सातारा/धुळे

६. नियोजन विभाग(कार्यासन १४५४), मंत्रालय, मुंबई.

७. वित्त विभाग (व्यय १०/अर्थसं-६), मंत्रालय, मुंबई.

८. कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. निवडनस्ती, फ-२ कार्यासन,म. व व.वि,.मंत्रालय,मुंबई.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : एफडीएम २०१८/प्र.क्र.१७/फ-२, दि.२६.०३.२०१८ सोबतचे विवरणपत्र

पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या १४० अस्थायी पदांचा तपशिल

अ. क्र.	पदाचे नाव	पुणे	कोल्हापूर	ठाणे	चंद्रपूर	वन्यजीव मुंबई	संशोधन पुणे	धुळे	प्र.मु.व.म.रा. नागपूर	एकूण अस्थायी पदांची संख्या
१	सहा.वनसंरक्षक	-	१	-	-	-	-	-	-	**१**
२	कनिष्ठ अभियंता	-	१	-	-	२	-	-	-	**३**
३	वनक्षेत्रपाल	-	४	१	-	-	२	१	-	**८**
४	वनपाल	२	१४	७	-	-	४	२	-	**२९**
५	वनरक्षक	६	३५	२०	-	-	२	४	-	**६७**
६	तैनाती वनरक्षक	-	४	-	-	४	-	१	-	**९**
७	लेखापाल	-	६	-	१	१	१	-	१	**१०**
८	लिपीक	२	-	-	-	१	२	-	-	**५**
९	सर्वेक्षक	-	१	-	-	-	-	-	-	**१**
१०	अनुरेखक	-	१	-	-	-	-	-	-	**१**
११	वाहनचालक	-	२	-	-	-	-	-	-	**२**
१२	शिपाई	-	२	-	-	-	-	-	-	**२**
१३	माळी	-	-	-	-	-	२	-	-	**२**
	एकूण	१०	७१	२८	१	८	१३	८	१	१४०

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.27 12:07:34 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग